# मुलांसाठी बाइबल
## प्रस्तुत

# मेंढपाळ मुलगा
# दाविद




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Lazarus
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen



60 गोष्टींतील 19 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

फार पुर्वी, इस्त्रालाचा राजा शौल याच्या काळात, दाविद नावाचा एक मुलगा, त्याच्या सात भावांना त्यांच्या वडीलांची मेंढरे सांभाळण्यासाठी मदत करीत असे. जरी तो लहान होता तरी तो मजबूत, शूर आणि देवावर प्रीति करणारा व देवावर भरोसा करणारा होता. तो बेथलेहेम नावाच्या गावात राहात असे.



1

एके दिवशी एका सिंहाने लहान मेंढरु नेऊन खाण्यासाठी कळपावर हल्ला केला. तरुण दाविदाने त्या सिंहावर प्रतिहल्ला केला. त्याने त्याची दाढी धरुन त्याला हाणून ठार केले व त्या लहान मेंढराला सिंहाच्या जबड्यातून सोडवून आणले. देवाने त्याची मदत केली आहे हे दाविद जाणून होता.



2

फार वाईट रितीने  शौल राजाने देवाच्या आज्ञेचे उल्लंघन केले होते म्हणून देवाचा संदेष्टा शमुवेल अजून पर्यंत दुःखी होता. "शौलासाठी तूं अजून किती दिवस शोक करत राहशील?" या शब्दात परमेश्वराने शमुवेलाला दटावले. "मी तुला इशायकडे पाठवितो, कारण मी त्याच्या एका पुत्रास माझ्याकरिता राजा निवडिले आहे." इशाय दाविदाचे वडील होते.



3

शमुवेल दुसऱ्या राजाचा अभिषेक करण्यासाठी जात आहे हे जर शौलाला कळले तर तो त्याला मारुन टाकील हे शमुवेलला माहित असतांना देखिल त्या संदेष्ट्याने परमेश्वराची आज्ञा पाळली.



4



जेंव्हा शमुवेल तेथे जाऊन पोहोचला, तेंव्हा इशायने त्याच्या सात पुत्रांना शमुवेलासमोरुन चालविले. आणि शमुवेलाने इशायला म्हटले की, "परमेश्वराने यांची निवड केली नाही." आता फक्त सगळ्यात लहान मुलगा दाविद राहिला होता. तो मेंढरांसोबत बाहेर होता. त्यांनी दाविदाला आंत आणले. आणि प्रभूने म्हटले, "ऊठ, त्यास अभिषेक कर, हाच तो आहे."

5

इकडे परमेश्वराचा आत्मा शौलाला सोडून गेला आणि तो एक अडचणीत असलेला मनुष्य बनला. उत्तम संगिताने त्याचे डोके ठिकाणावर येईल असे त्याच्या सेवकांना वाटले. एक तरुण मुलगा सुंदर रितीने तंतुवाद्य वाजवित असे त्याची माहिती त्यांच्यापैकी एकाला होती. तो तरुण मुलगा कोण असेल बरे? होय, दाविद.



6

दाविदाने वाजविलेल्या संगिताने शौल राजाला चैन पडत असे. शौलाने इशायला सांगितले की राजाची सेवा करण्यास तुमचा मुलगा दाविद याला राजवाड्यात राहू द्या. जेंव्हा जेंव्हा शौल राजावर दडपणाचा आणि भितीचा हल्ला होत असे तेंव्हा तेंव्हा दाविद तंतू वाद्य वाजवित असे व त्याच्याने शौल राजाला चैन पडत असे.



7

दाविद घरी गेल्यावर, पलिष्टी लोकांशी शौलाचे मोठे युध्द झाले. दाविदाचे भाऊ शौलाच्या सैन्यात होते. इशायने त्याची मुले कसे आहेत हे पाहण्यासाठी व त्यांना काही अन्न देण्यासाठी दाविदाला युध्दस्थळावर पाठविले.



8


गल्याथ नावाचा एक भला मोठा धिप्पाड पलिष्टी, सर्व इस्त्राएल सैनिकांना भिती दाखवित होता.
9


गल्याथ मोठ्याने ओरडून म्हणाला, "तुमच्यापैकी एकाची निवड करा आणि त्याने माझ्याकडे यावे, जर त्याने माझ्याशी लढून मला ठार मारले तर आम्ही तुमचे गुलाम बनू परंतू जर माझी त्याच्यावर सरशी होऊन मी त्याला ठार मारले तर तुम्ही आमचे दास होऊन तुम्ही आमची सेवा करावी." जेंव्हा इस्त्राएल लोकांनी त्या धिप्पाड मनुष्याला पाहिले तेंव्हा ते फारच घाबरले व ते सर्व
त्याच्या समोरुन पळून गेले.
10


मग दाविदाने शौलाला म्हटले, "त्या पलिष्ट्यामुळे कोणाहि माणसाचे मन कचरु नये; आपला दास जाऊन त्याशी लढेल." शौलाची अशी इच्छा होती की दाविदाने युध्द् पेहराव परिधान करुन तरवार धारण करावी. परंतू त्याऐवजी, दाविदाने त्याची गोफण घेतली आणि नाल्यातून पाच गुळगुळीत दगड उचलून घेतले.
11


दाविदाने युध्द् पेहराव व शस्त्र सामुग्री देखिल सोबत घेतली नाही हे पाहिल्यावर गल्याथ दाविदावर हसला. "मी तुझे मांस आकाशातील पक्ष्यांस आणि जंगलातील पशूस खायला देईन" असे म्हणत तो दाविदावर ओरडला. पण दाविदाने म्हटले, "मी परमेश्वराच्या नावाने तुझ्याकडे येत आहे ! आज परमेश्वर तुला माझ्या हाती देईल... कारण हे युध्द् परमेश्वराचे आहे !"
12


मग दाविद गल्याथ समोर धावत गेला. तो धावत जात असतांनाच, त्याने एक गुळगुळीत दगड त्याच्या गोफणीत ठेवून असा फेकला की तो गल्याथाच्या कपाळावर जोरात लागला. गल्याथ खाली पडला !
13


दाविद पळतच गेला आणि गल्याथची भली मोठी तरलवार काढून त्याच तलवारीने त्याने त्याचे डोके छेदिले. पलिष्टी लोकांनी जेंव्हा पाहिले की गल्याथ मारला गेला आहे तेंव्हा पलिष्ट्यांचे सर्व सैनिक जीव घेऊन पळाले.
14

हा तोच दाविद आहे जो तंतू वाद्य वाजवून त्याच्या मनाला आराम देत असे हे शौल राजाच्या लक्षात राहिले नव्हते. त्याने दाविदाला त्याच्या सैन्याचा अधिपती बनविले – आणि जेंव्हा लोकांनी दाविदाच्या विजयाचे गुणगान गाईले तेंव्हा त्याला दाविदाचा हेवा वाटला. "राज्य तेवढे खेरिज करुन त्याला अधिक मिळावयाचे ते काय राहिले?" असा शौलाने विचार केला. त्या दिवसापासून पुढे शौलाने दाविदावर डोळा ठेविला.




परत शौल राजाची मानसिक परिस्थिती बिघडली. म्हणून दाविदाने तंतू वाद्य वाजवून त्याला चैन देण्याचा प्रयत्न केला. तिन वेळा शौलाने दाविदाकडे त्याचा भाला फेकला. परंतू प्रत्येक वेळी दाविद बचावला. शौल दाविदाला घाबरत होता, कारण परमेश्वर त्याच्या बरोबर आहे हे तो जाणून होता, परंतू शौलाला मात्र परमेश्वराने सोडून दिले होते.




परंतू शौलाचा मुलगा, योनाथान, हा दाविदावर भावासारखे प्रेम करित होता. "माझा बाप शौल तुला मारुन टाकावयास पाहात आहे," अशी पुर्व सुचना त्याने दाविदाला दिली. म्हणून दाविद तेथून निसटून गेला. दाविदाच्या बायकोने त्याच्या बिछान्यावर दाविदासारखी मुर्ती झोपवून ठेवली व मध्य रात्रीच्या सुमारास खिडकीतून दाविदास उतरविले. जेंव्हा शौलाचे लोक सकाळीस आले तोवर दाविद तेथून निघून गेला होता.




दाविदाला शौलापासून खूप दुर पळून जावे लागले. तो पळून जाण्याच्या आधि त्याने व योनाथानने एक करार केला. त्यांनी सदैव एकमेकांना मदत करण्याचे अभिवचन दिले. दुःखाने, या दोन्ही मित्रांना एकमेकांपासून वेगळे व्हावे लागले. जेथे शौलाचे सैनिक त्यांचा शोध घेऊ शकणार नाही व जेथे ते न घाबरता राहू शकतील अशा ठिकाणाचा दाविदाला शोध घ्यावा लागला.




मेंढपाळ मुलगा दाविद

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

१ शमुवेल १६–२०

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!